# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

(सेंट्रल प्रोव्हिन्सेस शासन शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक 513 दिनांक 1 ऑगस्ट 1923 द्वारा स्थापित व महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, 2016 द्वारा संचालीत राज्य विद्यापीठ)

**(गोपनिय विभाग).**

परीक्षा भवन, एल. आय. टी. परिसर, अमरावती रोड, नागपूर – 440033

दुरध्वनी क्र. 0712–2523296, 6566875 फॅक्स क्र. 0712–2546263

गोप क्र./उन्हाळी–2023/01/ दिनांक –: 12/04/2023

प्रति,

प्राचार्य,

..............................................

..............................................

विषय :– अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या उन्हाळी–2023प्रात्यक्षिक परीक्षेबाबत.

महोदय,

आपणांस कळविण्यात येते की, उन्हाळी–2023 B.E. 6th & 8th Sem.(CBS) & B. TECH 6th Sem.(CBCS) च्या प्रात्यक्षिक परीक्षा खालील वेळापत्रकानूसार आपल्या महाविद्यालयात आयोजित करावयाच्या आहेत.

**1). B.E. 6th & 8th , Sem. (CBS)** *including Project* →
**2). B.TECH. 6th Sem. (CBCS)** →
} **03/05/2023 TO 06/05/2023**

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबत जोडलेल्या फार्म नं. १३ मध्ये (तीन प्रतीत) आपल्या महाविद्यालयात कार्यरत असलेल्या मान्यताप्राप्त शिक्षकांची नावे व त्यांच्या नावासमोर University Approval No., Mobile No., E-mail ID सहित (परीक्षा व विषय निहाय) अंतर्गत परीक्षक म्हणून नियुक्त करण्यास्तव त्यांच्या यादीमध्ये दिनांकासहीत समावेश करून पाठवावी. फार्म नं. **१३ मध्ये ज्या परीक्षेला व ब्रॅन्चला विद्यार्थी बसलेला नसेल त्याची माहिती देण्यात येवू नये** तसेच प्रत्येक परीक्षेच्या ब्रॅन्चला विषयनिहाय किती विद्यार्थी प्रात्यक्षिक परीक्षेला बसलेले आहेत त्या विद्यार्थ्यांची संख्या नमुद करण्यात यावी.

आपल्या महाविद्यालयातील कार्यरत असलेले व प्रात्यक्षिक परीक्षेच्या कामात व्यस्त असलेल्या मान्यताप्राप्त शिक्षकाची यादी तारखेनुसार तसेच विभागानूसार पाठवावी जेणे करून आपल्या महाविद्यालयात कार्यरत मान्यताप्राप्त शिक्षकांना दुस–या महाविद्यालयात बहिर्गत परीक्षक म्हणून नियुक्ती करण्यास सोईचे होईल.

वरील प्रात्यक्षिक परीक्षांच्या वेळापत्रकात कोणताही बदल विद्यापीठाच्या परवानगी शिवाय करता येणार नाही. तसेच आपल्या महाविद्यालयात नमूद वर्गाची प्रात्यक्षिक परीक्षा वरील वेळापत्रकाप्रमाणे कोणत्या तारखेस आयोजित केली आहे त्याबाबत दिनांक. १७/०४/२०२३ पर्यंत गोपनीय विभागास विशेष दुतामार्फत कळवून त्याची पोच घ्यावी.

**बहिर्गत परीक्षकांची नेमणुक महाविद्यालयाने आपल्या स्तरावर करु नये, अश्या प्रकारची नियुक्ती करावयाची असल्यास मुळ बहिर्गत परीक्षकांचे अनुपस्थित राहण्याचे कारणासहीत पत्र गोपनीय विभागात सादर केल्यावर गोपनीय विभागाकडुन पर्यायी बहिर्गत परीक्षकांची नेमणुक करण्यात येईल. बहिर्गत परीक्षकांची नेमणुक महाविद्यालयीन स्तरावर केल्यास अश्या महाविद्यालयाचे प्रात्यक्षीक परीक्षांचे गुण स्विकारण्यात येणार नाही, याची सर्वस्वी जबाबदारी महाविद्यालयाची राहील. याची नोंद घ्यावी.**

त्याचप्रमाणे आपल्या महाविद्यालयात संबंधित वर्गाची प्रात्याक्षिक परीक्षा संपल्यावर त्याचे गुणपत्रक ऑनलाईन college.rtmnuresults.org या संकेत स्थळावर पाठवुन त्याची Hard copy अंतर्गत व बाह्य परीक्षकांच्या स्वाक्षरीनिशी मोहरबंद लिफाफ्यात पुढील २४ तासाच्या आत गोपनिय विभागास विशेष दुतामार्फत त्यावर परीक्षेचे नांव, वर्ष, वर्ग, शाखा, प्रात्यक्षिक परीक्षेचा विषय इत्यादी नमुद करुन सादर करावे, अन्यथा प्रात्याक्षिक परीक्षांच्या गुणांचे मोहरबंद लिफाफे स्वीकारल्या जाणार नाही.

तसेच सर्व परीक्षेचे सेशनल गुण पत्रके हे दिनांक १५/०५/२०२३ पर्यंत ऑनलाईन college.rtmnuresults.org या संकेत स्थळावर पाठवुन त्याची Hard copy गोपनिय विभागास सादर करावी दिनांक १५/०५/२०२३ नंतर आलेले सेशनल गुण परीपत्रक क्रमांक १२५२ दिनांक ०८/११/२००६ नुसार प्रती दिन रु. १०००/- प्रमाणे दंड आकारण्यात येईल.

कृपया वरील बाबींची नोंद घेवून योग्य कार्यवाही करावी हि विनंती

टिप:-

१) गुण पाठविण्याची सुविधा संकेत स्थळावर उपलब्ध नसेल तर Mannualy Marks सादर करुन त्याची पोच घ्यावी.

संचालक
(परीक्षा व मुल्यमापन मंडळ)
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ, नागपूर